दि. २४/४/२३

# घरफोडीतील विधीसंघर्षित बालक नांदेड ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात

## साडेछत्तीस हजाराचा ऐवज जप्त



नांदेड, दि. २३ : नांदेड ग्रामीण पोलिसांनी घरफोडीतील विधीसंघर्षित बालकास ताब्यात घेतले असून त्याच्याकडून दोन मोबाईल, पाच ग्रॅम वजनाचे सोन्याचे मनी-मंगळसुत्र, चार तोळे वजनाचे चांदीचे चैन असा ३६ हजार ५०० रूपयांचा ऐवज जप्त केला आहे.

ग्रामीण पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरिक्षक श्रीधर जगताप, गुन्हे शोध पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरिक्षक आनंद बिचेवार, पोलीस अंमलदार विक्रम वाकडे, जाधव, शेख सत्तार, मुंडे, संतोष बेल्लुरोड, कलंदर, माने, तेजबंद आणि दासरे यांच्या पथकाने एका अल्पवयीन विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेवून त्याची चौकशी केली असता त्याने चोरलेले दोन मोबाईल, सोन्याचे ५ ग्रॅम वजनाचे ३३ मणी, दोन मोठे व दोन लहान मंगळसुत्र आणि चांदीच्या पायात घालायच्या चैन जोडी दोन असे साहित्य काढून दिले.

या सर्व साहित्याची किंमत ३६ हजार ५०० रुपये आहे. देगावचाळीत अनिल ग्यानोबा भोळे यांच्या घरी झालेल्या चोरीतील हा ऐवज आहे. त्या संदर्भाने वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५१७/२०२३ दाखल आहे. विधीसंघर्षग्रस्त बालकाला पुढील कार्यवाहीसाठी ऐवजासह वजिराबाद पोलीसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.